ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# साधनकला आत्मसुखाची प्राप्ती होण्याचा मार्ग

* श्री . हरीभाऊ बाबूराव खुरंगे,

* मु . खुरंगेवाडी, पो . चान्दे ( बु ), ता . कर्जत , जि – अहमदनगर, महाराष्ट्र . पिन – ४१४४०२

साधनकला आत्मसुखाची प्राप्ती होण्याचा मार्ग या विषया वरती मी माझे मनोगत व्यक्त करतो .हा विषय समजून देण्यासाठी मी श्री ज्ञानदेवांच्या ग्रंथाचे आधार घेऊन मी माझे मनोगत व्यक्त करण्यास सुरवात करत आहे . आपल्या महाराष्ट्रातील माणसांचे भ्याग्य फार मोठे आहे असे म्हणण्यास काही संकोच वाटत नाही .आपल्या महाराष्ट्रामध्ये अनेक संत – महात्मे जन्माला आले . श्री संत माऊली नेश्वर, चांगदेवासारखे योगी पुरुष येथे जन्मास आले . संत शिरोमणि , तुकाराम महाराज येथेच अवतरले निळोबा महाराज , संताजी , नामदेव , जनाबाई , गोरोबा काका , चोखा महाराज , सजण कसाई , दादू पिंजारी , शांतीब्रम्ह एकनाथ , संत गाडगेबाबा , राष्ट्र संत तुकडोजी महाराज , स्वामी विवेकानंद अशा संत महापुरुषाची  ही जन्म भूमी आणि कर्म भूमी म्हणून महाराष्ट्राच्या मातीचे सोने झाले . त्याच महाराष्ट्रात आपणाला जन्म मिळाला ही पुर्व जन्माची पुण्याई असेच म्हणावे लागेल .

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

श्री ज्ञानदेवांनी जे धर्म ग्रंथ लिहले ते सर्व मराठी भाषेत लिहले . भगवत त गीतेवरील टिका म्हणजे भावार्थ दिपिका , अभंग गाथा हरिपाठ , चांगदेव पासष्टी , अमृतानुभव किवा अनुभवामृत या ग्रंथला दोन नावे ,भावार्थ दिपिकेच्या अनेक भाषेत भाषेन्तरे झाली . तसे अमृतानुभव हा ग्रंथ अत्यंत उच्च पातळीवरून लिहला आहे . ज्या साधकाचा अभ्यास भावार्थ दिपिकेचा पूर्ण झाल्यावरच अनुभवामृता विषय समजण्यास सोपा जाईल असे मला वाटते .

मनुष्य जीवाचा मूळचा स्वाभाव –मुळची आवस्था सुखरूपच आहे . परंतु त्या मनुष्य जीवाला आविद्देचे  आज्ञानाचे अछादन ( मलिनता ) आल्यामुळे जीव मुळचा स्वभाव  विसरून शरीर प्रकृतीचा अहंकार धरून सर्व शरीर संबधाचे धन – दारा , पुत्र हे सर्व माझे म्हणून त्यातच सुख शोधून पाहू लागला  रात्र दिवस सुखासाठी प्रयत्न करू लागला आणि सुखाच्या शोधत धडपडत आहे .

" ऐ ये मूर्त लोकी सुखाची कहाणी |

ऐकिजे जो कायणाच्या श्रवणी |

जैसे सुख निद्र अंथुरणी इंगळांच्या || "_ भावार्थ दिपिका .

तेव्हा खरा मार्ग चुकला  - वर्म चुकले तुकाराम महाराज म्हणतात –

" चुकलीय वर्मा , फेरापडे ||

म्हणून श्री ज्ञानदेव हरिपाठत म्हणतात –

ISSN–2277- 8721
EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022
OPEN ACCESS Original Research Article

" सद्गुरू वाचोनी सापडेना सोय , वंदावेते पाय अधि अधि ||

साधक ज्या ज्या मार्गाने सुख – आत्मसुख मिळवता येईल ते ते सर्व मार्ग धुंडाळीत राहतो . प्रथम सुरवात मूर्ति पुजा , सत्संग , तिर्थ यात्रा ,श्रवण – मनन – चिंतन –वाचन –लेखन – यम – नियम – आसन – प्राणायाम – प्रत्याहार – धारणा – ध्यान – समाधी अशा अनेक प्रकारचा आभ्यास शारिरीक व मानसिक तपचर्या करण्याची ईछया त्या साधक जीवाला असते . तो त्याचा जन्म सिद्धं हक्क आहे असे मला वाटते.

पृथ्वीच्या पोटात लोहचुंबकाची खाण आहे म्हणून होकायंत्राचा काटा दक्षिण – उत्तर राहत असतो . त्या प्रमाणे त्या मनुष्य जीवाचा हक्क असल्यामुळे जीव स्वता आत्मसुखाचा ब्रम्हसुखाचा अत्यंत अभिलाषी आहे . अशा सुखाच्या प्राप्तीसाठी अनेक प्रयत्नांच्या रूपाने तो सारखा धावत राहतो . प्रत्येक जन्मात , प्रत्येक योनीत , जन्मल्या पासून मरेपर्यंत कोणत्या न कोणत्या प्रयत्नाने त्या जीवाला सुख मिळावे म्हणून तो क्षणभर सुद्धा विश्रांति घेत नाही . जोपर्यंत त्या जीवाला आत्म सुखाची ब्रम्हसुखाची प्राप्ती होत नाही तोपर्यंत तो जीव जन्म मरणाच्या चक्रातून सुटत नाही .

"किती वेळा जन्मा यावे | किती व्हावे फजित || " तेव्हा अशा आत्मसुखाचा ब्रम्हसुखाचा योग केव्हा घडून येतो . म्हणाल तर सदुरूची कृपा ,सदुरूंचा आशीर्वाद , सदुरूंच्या चरणांनचा स्पर्श झाल्या बरोबर हे कार्य घडून येते असे मला वाटते .

" लोह परीसाची न साहे उपमा |
सद्गुरू महिमा आगाधाची ||

म्हणून ज्ञानदेवांनी गुरु निवृत्ती नाथाना विनती केली .

" या करणे श्रीगुरुनाथ | जव मस्तकी न ठेवीती हात ||
निवृत्ती दास असे विनवीत | तेवी निषांत केवि होय ||
अनुभवामृत दृष्टांतव | आत उपाय वन वसन्त् |
जो आद्देचा आहेव तंतु || अमूर्त ची परि मुर्तु | करुण्याचा || _ अंनुभवामृत

**अर्थ :**

वनात जंगलात अनेक **प्रकारचे** वृक्ष – लता वेलिना फुले व फळे ही वसंत ऋतु आला तरच येतात . इतर ग्रीष्म – वर्षा – शरद – हेमंत व शिशिर हे पाच ऋतु जरी त्या वनात येऊन गेले तरी त्या वनाला त्या वृक्षाला त्याचा काही उपयोग होत नाही . वनाची शोभा - सौंदर्य , शुशोभितपणा केवळ वसंत ऋतुमुळेच वाढत असतो . त्या प्रमाणे साधकाच्या जीवनात सद्गुरूच्या कृपा दृष्टीने आत्मसुखाचा ब्रम्हसुखाचा लाभ येतो . एकदा का साधकाला सदुरूचा बोध – कृपादृष्टी झाली कि मग मात्र त्याने केलेल्या आभ्यसची तप्श्र्च्य्या फल श्रुति होते . त्यमुळे सदुरूला वसंत ऋतूची उपमा दिली आहे असे मला वाटते .

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

**द्रुष्टान्त २ :- ओवी –**

" आता तेची समयी , सद्गुरू भेटले पाही ||

ते वीची तीही काही | वं चि जे न || भा . दि . ||१८ /९९७ ||

ओवी –

" तेसा वैराग्य लाभू झाला | परी सद्गुरू ही भेटला ||

जिव्ही अंकुर फुटला | विवेकांचा || भा . दि . ||१८ / १००१ ||

**अर्थ :**

साधकाने आजपर्यंत जो आभ्यास केला त्याचे फल त्या साधकाला सद्गुरू भेटला तर त्याच्या श्रमचे फळ हळू हळू मिळत असते . चंद्राच्या सोळा कला आपण पाहतो प्रत्येक कला एक एक दिवस वाढत जाऊन पोर्णिमेच्या दिवशी संपूर्ण चंद्र सोळा कालांनी प्रकट होतो . त्याच पोर्णिमची चकोर पक्षी आतुरतेने वाट पाहत असतो . कारण त्या चकोर पक्षाला पोर्णिमेच्या दिवशी अमृत प्राशन करण्यास मिळते . त्याप्रमाणे साधकाला सद्गुरू रूपी पोर्णिमेची अपशकता असते . तसा योग आला सद्गुरू रूपी पोर्णिमेचा उदय झाला तर त्याचा अनेक विषयांच्या संगतीने पसरलेल्या सर्व ज्ञानकला अनामसे एक वटून एक रूपाने प्रकाशू लागतात . या चंद्राच्या सोळा कला संपून सत्राव्या कलेचे ज्ञानदेवांनी वर्णन केले आहे .

" इडा पिंगला एकवटती | सुष्मे मध्ये लिन होती ||

हीच सतरावी जीवन कला | पहावा आत्मचिंतून ||

सद्गुच्या कृपादृष्टीने सर्व अभ्यासाचे फळ म्हणजे आत्मज्ञान ब्रह्मज्ञान फलद्रूप होण्यास सुरवात होते असे मला वाटते .

**द्रुष्टान्त ३ : ओवी –**

" जो भेटलीयाची सवे | पुरती उपायची धावे ||

प्रकृती गंगा थिरावे | सागरी जिये || अ . अ || ८ ||

**अर्थ :**

गंगा नदी सागराला मिळाल्यानंतर तिचे प्रवाह पाणी वाहण्याचा वेग हे सर्व संपून जातात , गंगेचे नाव हे मागमुस ही शिल्लक राहत नाही . गंगेसी मिळतं गंगाजल असे होऊन जाते .

त्याप्रमाणे प्रवृत्ती व निवृत्ती रूपी प्रयत्नात तसेच ईहलोकीच्या परमार्थिक पारलौकिकांच्या विचारात रममाण होणारा साधकाच्या त्या प्रवृत्तीरूपी गंगेचा अखंड वाहणारा ओघ हा जेव्हा सद्गुरू रूपी महासागराला भेटतो – मिळतो त्या विचाराशी एकरूप होतो . त्या वेळेस तो साधक ( जीव ) आपोआप आपल्यालाच ठिकाणी शिव पणाला – आत्मज्ञानी – सुखसागरात – ज्ञानसागरात एकरूप होऊन राहतो असे मला वाटते .

" तरी गुरु दाविलीय वाटा | येउनी विवेक तीर्थ तटा ||

धुवूनिया मळकटा | बुद्धीचा तेणे || भा . दि . || १८ || १०११ ||

गुरु वाक्य उठ विला | बोधिनिश्च्यि आपुला ||

न्याहाळी हाती घेतला | आरिसा जैसा || १८ || १०३२ ||

**सारांश :**

राखो जाता शिष्यते | गुरूपणहि धाडिले थिते ||

तरी गुरुगौरव जायते | सांडी चिना || अ . अ || २ || १२११ ||

**अर्थ :**

सद्गुरूशिष्याचे कल्याण व रक्षण करण्यात अत्यंत दक्ष असतात व त्यामुळे सद्गुरू हे आपले गुरुपण घालवून बसत असतात . कारण शिष्याचे कल्याण व्हावे अशा महान उद्देशाने हे अपरोक्ष ज्ञानाचे जे ज्ञान दान करतात त्या त्यांचा उदारपणामुळे गुरूला गुरुपण प्राप्त झालेले असते. शिष्यच्या हृदयात मी ब्रम्ह आहे . मी आत्मा आहे सर्व नाटलो आहे अशा प्रकारे शिवपणाचे अद्वैत ज्ञान जागृत होते हा त्या ज्ञानाचा स्वभाव असल्याने त्याचा योगाने शिष्याच्या मनात आत्मियकता , सर्वत्मकता येत असते . आपला ही तसाच अनुभव असावा असे माला वाटते .

ज्यावेळी म्हणजे अशा परिस्थितीत शिष्यचे शिष्यत्व व गुरूचे गुरत्व संपून एकरूप होते . ते गुरु शिष्याचे नाते संपून जाते आणि गुरु शिष्य दोघेही सारख्याच योग्यतेचे – समान अधिकारचे होऊन राहतात . असे जरी झाले असेल म्हणजे गुरुणे गुरुपण – गुरुत्व सोडले – टाकून दिलेले असेल तरीपण गुरुपणाची माहिती गुरुपणाचा मोठेपणा , गुरूचा गौरव – वैभव हे मात्र गुरूला सोडत नाही . गुरु शिष्याला अधिक जवळ करू लागतात . त्याच प्रमाणे शिष्य ही गुरुच्या ज्ञानाची जवळीक अधिकाधिक संपादन करत असतो . त्यामुळे गुरूचे वैभव मोठेपण अधिक वाढत जाते ते शोभून दिसते .

**द्रुष्टान्त १ ला :**

एखादा श्रीमंत – कोट्यधीश असतो त्याचाकडे एक गरीब दरिद्री माणूस आपणास धनाची मददत मिळावी म्हणून तो त्या कोट्यदिश कडे जातो आणि विनंती करतो माला काही तरी मददत करा . तो श्रीमंत माणूस त्या गरीबला उदार अंतकरणाने मदत करतो . आणि स्वता सारखे कोट्यधीश बनवतो त्यामुळे दोघेही सारख्याच योग्यतेचे होऊन राहतात . त्याप्रमाणे सद्गुरू शिष्याला आत्मज्ञान ब्रह्मज्ञान देऊन आपल्याच योग्यतेला शिष्यरण करतात दोघेही अपरोक्ष ज्ञाननाचे अधिकारी होतात . हाच गुरूचा मोठेपणा आहे . असे माला वाटते .

**द्रुष्टान्त २ ला :**

आपल्या घरामद्धे प्रथम एक दिवा असतो . त्या दिव्याने आपण अनेक दिव्यांना प्रज्वलित केले तरीपण त्या पहिल्या दिव्याच्या

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

ठिकाणी असणारे दिव्ये पण प्रकाशमान म्हणजे त्याची मुळची प्रकाशरूपता ही कोठे जात नाही व कमी ही होत नाही . त्याच प्रमाणे गुरुणे शिष्याला आत्मज्ञान ब्रह्मज्ञान स्वरूपज्ञान देऊन आपल्या सारख्या गुरु पदास नेऊन बसवले म्हणून गुरूपदाची गुरुपणाची शोभा सौन्दर्य – प्रकाशरुपूपता काही कमी होत नाही . त्यात कसलाहे उणेपणा दिसून येत नाही . असे मला वाटते .

अशा प्रकारे मनुष्य जीवनाला – साधकाला अवद्देचा ( आज्ञांनाचा मलिन ) पण आलेला . तो सद्गुरूच्या कृपा दृष्टीने स्वछ: धुतला जातो . त्याच प्रमाणे तुम्हा आम्हा सर्वांना सद्गुरूची कृपा दृष्टीचा लाभ व्हावे हीच ईश्वर चरणी प्रार्थणा करतो .

अशिच प्रार्थना श्री ज्ञानदेवांनी केली :-

आता विश्वात्मके देवे ||
ये मराठी चिये नगरी | ब्रम्हविधेचा सुकाळू करी ||
आत्मसुखाची बाळलेणी | लेववू जगा || ( भावार्थ दिपिका )
हे ब्रम्ह रसाचे परगुणे | केले अर्जुना लागी नारायणे ||
तेथे अवचित पाहुणे | पातलो आम्ही || ( भावार्थ दिपिका )

**ग्रंथ संदभ :**


- १ ) भावार्थ दिपिका
- २ ) एकनाथ भागवत
- ३ ) तुकाराम महाराज गाथा
- ४ ) चांगदेव पाष्टी
- ५ ) हरिपाठ
- ६ ) अमृतानुभव


**Cite This Article:**

** श्री . हरीभाऊ बाबूराव खुरंगे, (2022)* साधनकला आत्मसुखाची प्राप्ती होण्याचा मार्ग, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No. XI (Special Issue-II), 129-133.*